# BDC LIBRARY
## New Paper Clipping
*A.Y. 2024-2025*

# ध्येयवेडी माणसंच इतिहास घडवतात : डॉ. कळमकर



**पाटण :बोलताना डॉ. संजय कळमकर, व्यासपीठावर अमरसिंह पाटणकर, याज्ञसेन पाटणकर, संजीव चव्हाण, प्रा.एस.डी.पवार व मान्यवर.**

आपण काय वाचतो यावर मनात प्रश्न निर्माण होतात. जीवनाला दिशा देणाऱ्या वाचनामुळे मनामध्ये प्रश्न निर्माण होतात आणि तेच प्रश्न जीवनाला दिशा देत असल्याने जो वाचतो तोच जीवनात यशस्वी होतो. म्हणूनच 'वाचाल तर वाचाल.' मोबाईल युगात, मोबाईलच्या विळख्यात वाचन कमी झाले आहे. मोबाईलच्या आभासी दुनियेतून बाहेर पडून वास्तव जीवनाला सामोरे जाण्याची गरज निर्माण झाली आहे. वास्तव जीवन फार सुंदर आहे. ध्येयवेडी माणसंच इतिहास घडवतात आणि शहाणी माणसं हाच इतिहास वाचतात. उमेदीच्या वयात आपली क्षमता आणि ताकद ओळखून जीवनाला दिशा द्या, असे प्रतिपादन प्रख्यात कथाकथनकार डॉ. संजय कळमकर यांनी केले.

पाटण येथील बाळासाहेब देसाई कॉलेजमधील वार्षिक पारितोषिक समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कोयना एज्युकेशन सोसायटीचे जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर होते. यावेळी संस्थेचे जॉईंट सेक्रेटरी डॉ. सुहास देशमुख, संचालक याज्ञसेन पाटणकर, संजीव चव्हाण, प्राचार्य डॉ. शिरीष पवार, आयक्यूएसी समन्वयक प्रा. डॉ. हेमलता काटे, प्रा. एन. ए. कदम, विद्यार्थी संसद सचिव सुप्रिया शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी डॉ. संजय कळमकर म्हणाले, जो सत्य बोलतो, जो निष्ठावान आहे, ज्याच्या मनात तारुण्याची ताकद आहे. त्यांनी आयुष्याची दुसरी बाजू लक्षात घेतली पाहिजे. कारण त्याचवेळी तुम्हाला जगण्याची योग्य दिशा मिळणार. बुद्धी बंगल्यात, श्रीमंताच्या घरातच जन्म घेते असे समजू नका. बुद्धीला भेदाभेद नाही. ती कुठेही कानाकोपऱ्यात, पत्र्यात, झोपडीत, डोंगरदऱ्यात जन्म घेते. त्याच्यासाठी बंगलाच पाहिजे, श्रीमंतच पाहिजे असं नाही. आपले आदर्श महान हवेत. आजच्या तरुण-तरुणींनी जीवनाच्या या आनंदी वयात काही तणाव न घेता या वयातच कर्तृत्व गाजवण्याची धमक ठेवून जीवन घडवा, त्यासाठी आनंदी राहा.

अमरसिंह पाटणकर म्हणाले, आई-वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेऊन दिलेल्या बुद्धीचा योग्य वापर करा. स्वतःला शिस्त लावून घ्या. जीवनात शिस्तीला खूप महत्त्व आहे. आपल्यातील क्षमता ओळखून आपण आपले जीवन घडवले पाहिजे. यावेळी विशेष प्रावीण्य प्राप्त प्राध्यापक, क्रीडा क्षेत्रात उज्ज्वल यश संपादन केलेले विद्यार्थी तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मान करण्यात आला.

यावेळी पालक, विद्यार्थी, नागरिक, महिला, युवक उपस्थित होते. प्राचार्य एस. डी. पवार यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. दीपक डांगे-पाटील व प्रा. डॉ. विनायक राऊत यांनी सूत्रसंचालन केले. सुप्रिया शिंदे यांनी आभार मानले.